# प्रेसनोट

दि.१७/०६/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.६६१/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ व भारतीय न्याय संहिता कलम २३८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) लक्ष्मण सुकदेव पोटे, वय–३५ वर्ष, पोकॉ/५३७, नेमणुक पाथर्डी पो.स्टे., जि.अहिल्यानगर<br>२) रामदास जयराम सोनवणे, पोना/१७८०, नेमणुक पाथर्डी पो.स्टे.<br>३) राहुल शिवाजी साबळे, रा.शिक्षक कॉलनी, माळी बाभुळगाव, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे हॉटेलवर कारवाई न करणेकरीता आरोपी लोकसेवक पोटे यांनी महिन्याला २०००/– रुपये हप्ता दयावा लागेल असे म्हणुन लाचेची मागणी केली असल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कार्यालयाकडे लाच मागणी बाबत नोंदविलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.१५/६/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी केली. सदर लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक लक्ष्मण सुकदेव पोटे यांनी तक्रारदार यांचेकडे शिवनेरी मिसळ हॉटेल वर कारवाई न करण्यासाठी पंच साक्षीदार समक्ष दर महीन्याला १,५००/– रूपये प्रमाणे हप्ता म्हणुन लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पंचा समक्ष स्विकारण्याचे मान्य केले.दि.१७/६/२०२५ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक पोटे यांनी सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष पाथर्डी पोलीस स्टेशन कडील पोस्को कायदया प्रमाणे दाखल गुन्हयातील वैद्यकिय तपासणीसाठी उप जिल्हा रूग्णालय, पाथर्डी येथे आणलेल्या पोलीस कोठडीतील आरोपी राहुल शिवाजी साबळे यास घेण्यास सांगुन राहुल साबळे यास ती रक्कम लाचेची असल्याचे माहीत असुनही त्याने सदर रक्कम स्विकारून त्यानंतर आरोपी लोकसेवक पोटे यांचे सांगणेवरून आरोपी राहुल साबळे यांनी सदर लाचेची रक्कम पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार रामदास जयराम सोनवणे यांचेकडे देवून त्यांना लाचेच्या रक्कमे सह पळवून लावून पुरावा नष्ट केला. सदर बाबत १)आरोपी लोकसेवक लक्ष्मण सुकदेव पोटे, पोकॉ/५३७ नेमणुक पाथर्डी पो.स्टे. २)आरोपी लोकसेवक रामदास जयराम सोनवणे, पोना/१७८०, नेमणुक पाथर्डी पो.स्टे. ३)आरोपी खाजगी इसम राहुल शिवाजी साबळे यांचेविरुध्द पाथर्डी पो.स्टे. गु.र.नं.६६१/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ व भारतीय न्याय संहिता कलम २३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर